दै.रजि.नं. /२०२६
दाखल ता. / /२०२६

Exh.1

स.क्रि.के.नं. /२०२६

SCC 190/2026

मे.प्रथमवर्ग न्यायदंडधिकारीसो, राधानगरी
यांचे कोर्टात...

Rs. 5 ONLINE

ओंकार शुगर अॅन्ड डिस्टीलरी पॉवर
प्रा.लि.(युनिट नं.३)फराळे,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर तर्फे
ऊस पुरवठा अधिकारी
श्री. सातापा बळवंत खाडे
व.व.४२, धंदा : नोकरी,
रा. फराळे, ता.राधानगरी,
जि. कोल्हापूर
} फिर्यादी

Order-
Put up for verification.
Sd/-
I/c. J.M.F.C.,
Radhanagari.
Dt. 04/06/2026

वि

श्री. समीर आनंदराव पाटील
व.व.५५, धंदा : कॉन्ट्रॅक्टर,
रा.चंद्रे, ता.राधानगरी,
जि.कोल्हापूर
} आरोपी

दि निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट
कलम १३८ प्रमाणे फिर्याद...

यातील फिर्यादी यांची फिर्याद अशी की,

१. फिर्यादी कारखाना हा भारतीय कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत कारखाना आहे. फिर्यादी कारखाना साखर व इतर उपपदार्थाचे उत्पादन करत असतो. त्याकरीता फिर्यादी कारखाना सभासद, बिगर सभासद, ऊस उत्पादक शेतकरी यांचेकडून कार्यक्षेत्रातून अगर कार्यक्षेत्राबाहेरून आवश्यक असणारा ऊस कारखान्याकडे ऊस तोडणी न वाहतुकीव्दारे आणला जातो. फिर्यादी कारखान्यास ऊस तोडणी व वाहतूक करणेकरीता सबंधीत ऊस तोडणी व वाहतूक कॉन्ट्रॅक्टर यांचेबरोबर ऊस तोडणी व वाहतूकीचा करार करण्यात येतो. त्या करारापोटी सबंधीत कॉन्ट्रॅक्टर यांना गळीत हंगामपूर्व ॲडव्हान्सची रक्कम अदा केली जाते.

२. यातील फिर्यादी कारखान्याने सदरची फिर्याद दाखल करणेचा अधिकार कंपनीचे मंडळाने दि. ०६.०३.२०२६ इ.रोजीच्या ठराव नं.३ व ४ ने श्री.सातापा बळवंत खाडे यांना दिलेला आहे. तसेच फिर्यादी कारखान्याचे जनरल मॅनेजर यांना कारखान्याचे कागदपत्रांची खरी नक्कल करण्याचा अधिकार ठरावाने दिलेला आहे. सदर फिर्यादी कारखान्यातर्फे फिर्याद दाखल करणार श्री.सातापा बळवंत खाडे यांना फिर्यादी कारखाना व आरोपी यांचे दरम्यान झालेल्या व्यवहाराची माहिती होती व आहे.

३. आरोपी हा ऊस तोडणी वाहतूक व कॉन्ट्रॅक्टर आहे. आरोपी यांनी फिर्यादी कारखान्याबरोबर त्यांच्या मालकीचा ट्रक/ट्रक्टर/छकडी या वाहनांव्दारे सन २०२५– २६ या गळीत हंगामाकरीता ऊस तोडणी व वाहतूकीचा लेखी करार करून दिलेला आहे. सदर करारापोटी आरोपी यांनी फिर्यादी कारखान्याकडून ॲडव्हान्स पोटी ता. ०९.०९. २०२५ इ. रोजी रक्कम रु. १,२३,६३६.००/– (अक्षरी रक्कम रू. एक लाख तेवीस हजार सहाशे छत्तीस), ता. ०२.०७.२०२५ इ. रोजी रक्कम रू. २,३२,७२८.००/– (अक्षरी रक्कम रू. दोन लाख बत्तीस हजार सातशे अठावीस) व ता. २७.०५.२०२५ इ. रोजी रक्कम रू. २,४३,६३६.००/– (अक्षरी रक्कम रू. दोन लाख त्रेचाळीस हजार

सहाशे छत्तीस) अशी एकुण रक्कम रू. ६,००,०००.००/— (अक्षरी रक्कम रू. सहा लाख) इतक्या रक्कमेची उचल केलेली आहे. त्याप्रमाणे फिर्यादी कारखान्याने खाते उतारा ठेवलेला आहे. सदरची ॲडव्हान्सची रक्कम ऊस तोडणी व वाहतूकीतून परतफेड करणेची हमी व खात्री तुम्ही आरोपीने फिर्यादी कारखान्यास दिलेली होती. तथापी आरोपी व फिर्यादी कारखान्यामध्ये ठरले कराराप्रमाणे ऊस तोडणी व वाहतूक करून ॲडव्हान्स रक्कमेची परत फेड केलेली नाही. त्यामुळे आरोपीकडून फिर्यादी कारखान्यास आरोपीने केलेल्या तोडणी व वाहतूकीच्या कामाची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम व्याजासह व खर्चासह रक्कम रू.६,५६,१७८.००/— (अक्षरी रक्कम रू. सहा लाख छपन्न हजार एकशे अष्ट्यात्तर) येणे बाकी लागत आहे.

४. फिर्यादी कारखान्याने आरोपीकडून कायदेशिर येणे बाकी असलेल्या रक्कमेची वारंवार मागणी केली असता आरोपीने फिर्यादी कारखान्यास सदर रक्कमेच्या परतफेडी पोटी बॅक ऑफ इंडिया, शाखा. क।। वाळवे, ता.राधानगरी, जि कोल्हापूर या बॅंकेचा दि. २०.०३. २०२६ इ.रोजीचा चेक नं.०४७६६५ रक्कम रू.६,५६,१७८.००/— (अक्षरी रक्कम रू. सहा लाख छपन्न हजार एकशे अष्ट्यात्तर) या रक्कमेचा चेक दिला. व चेक वटणेची हमी व खात्री फिर्यादी कारखान्यास दिली.

५. सदरचा चेक फिर्यादी कारखान्याने बॅंक ऑफ इंडिया शाखा राधानगरी येथे खातेवर दि. २०.०३.२०२६ इ. रोजी भरला असता न वटताच दि. २४.०३.२०२६ इ. रोजी 'फंड्स इनसफिसिएंट' या बॅंकेच्या शेऱ्यानिशी परत आलेला आहे

६. तद्नंतर सदर चेकबाबत फिर्यादी कारखान्याने आरोपीस दि. २७. ०३.२०२६ इ. रोजी वकीलांमार्फत रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीने दि. ३०.०३.२०२६ इ. रोजी स्विकारलेली आहे. सदर वस्तुस्थितीची माहिती असून देखील आरोपीने फिर्यादीची कायदेशीर देणे लागत असलेली व मागणी केलेली रक्कम आजअखेर

दिलेली नाही. तसेच आरोपीने फिर्यादीला चेकची रक्कम कायद्याने १५ दिवसाच्या मुदतीत म्हणजेच दि. १४.०४.२०२६ इ. रोजी पर्यंत देणे आवश्यक होते. तरीदेखील सदरची रक्कम आरोपीने फिर्यादीला दिलेली नाही.

७. वरील वस्तुस्थितीप्रमाणे आरोपीने त्यांचे बॅकेतील खातेवर पुरेशी रक्कम शिल्लक नसलेची माहिती असून देखील फिर्यादी कारखान्याची हेतुपुरस्सर घोर फसवणूक करण्याच्या उद्देशाने व फिर्यादी कारखान्याचे आर्थिक नुकसान करण्याच्या दृष्ट हेतूने जाणून बुजून आरोपीचे खातेवर रक्कम शिल्लक नसलेची माहिती आरोपीला असताना देखील आरोपीने फिर्यादी कारखान्याला बोगस, बनावट व न वटणारा चेक देऊन आरोपीने फिर्यादी कारखान्याची जाणीवपूर्वक घोर फसवणूक केलेली आहे. यावरूनच आरोपीचा फिर्यादी कारखान्यास फसवण्याचा दृष्ट हेतू दिसून येतो. त्यामुळे आरोपीने फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

८. सदरचा न वटणारा चेक आरोपीने फिर्यादी कारखान्यास दिलेमूळे फिर्यादी कारखान्याची जाणीवपूर्वक फसवणूक झालेमुळे सदरची फिर्याद फिर्यादी कारखान्यास मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे.

९. सदरची फिर्याद मुदतीत आहे. तसेच सदरचा गुन्हा याच मे. कोर्टाच्या स्थलसिमेत घडलेला आहे. फिर्यादी कारखाना हा मे. कोर्टाच्या स्थलसिमेत रहिवास करत असेलेने सदरची फिर्याद चालण्यास पात्र व मे. कोर्टाच्या अधिकार कक्षेत आहे.

१०. सदरच्या फिर्यादीस योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प लावलेला आहे.

**<u>११. सबब, फिर्यादी यांची मे. कोर्टास नम्र विनंती की,</u>**

अ. आरोपीस दि निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे न वटणारा चेक दिल्याने जास्तित जास्त कडक शासन व्हावे.

ब. फिर्यादी कारखान्यास आरोपीकडून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील तरतुदीनुसार चेकची एकूण रक्कम रूपये रू.६,५६,१७८.००/— (अक्षरी रक्कम रू. सहा लाख छपन्न हजार एकशे अष्ट्यात्तर) व फिर्यादीचा खर्च नुकसान भरपाई म्हणून मिळावी.

क. अन्य न्यायाचे हुकूम याचकामी फिर्यादी कारखान्यास मंजूर व्हावेत.

ड. जरूर तर फिर्याद दुरूस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

राधानगरी
दि.११.०५.२०२६

मे.जा.व्हावे

रजि.नं. २१८७६६

फिर्यादी

<u>**यासी पुरावा :**</u>

१. फियादी कारखान्यातर्फे अधिकारी

२. फिर्यादी कारखान्याने सदरची फिर्याद दाखल करणेचा अधिकार कंपनीचे मंडळाने दि. ०६.०३.२०२६ इ.रोजीच्या ठराव नं.३ व ४ ने श्री. साताप्पा बळवंत खाडे यांना दिलेला आहे.

२. आरोपीने फिर्यादी कारखान्यास दिलेला दि.२०.०३.२०२६ इ. रोजीचा बँक ऑफ इंडिया, शाखा. क।। वळवे, ता.राधानगरी, जि कोल्हापूर या बँकेचा चेक नं.०४७६६५ रक्कम रू. ६,५६,१७८.००/— (अक्षरी रक्कम रू. सहा लाख छपन्न हजार एकशे अष्ट्यात्तर) चा चेक.

३. बॅक ऑफ इंडीया शाखा राधानगरी या बॅकेचा दि. २४.०३.२०२६ इ. रोजीचा चेक रिर्टन मेमो.

४. आरोपीस फिर्यादीने वकीलांचेमार्फत दि. २७.०३.२०२६ इ. रोजी पाठविलेल्या नोटीसीची स्थलप्रत.

५. आरोपीस फिर्यादीने वकीलांचेमार्फत दि.२७.०३.२०२६ इ. रोजी पाठविलेल्या नोटीसीची दि.२८.०३.२०२६ इ. रोजीची पोस्टाची पावती.

६. आरोपीस फिर्यादीने वकीलांचेमार्फत पाठविलेल्या नोटीसीचा दि. ३०.०३.२०२६ इ. रोजीची पोस्टाची पोहोच.

७. आरोपीचा फिर्यादी कारखान्याकडील खातेउतारा.

८. संबंधित बॅंकेचे अधिकारी.

याशिवाय फिर्यादीस जादा पुरावा करणेस परवानगी असावी ही नम्र विनंती.

राधानगरी

दि.११.०५.२०२६

फिर्यादी